स्थायी समिती
दाखल विषय – दि. २/६/२०२०

**विषय क्रमांक :– १८३ त्वर्य**

मा.दिपक पोटे व मा.महेंद्र पठारे यांचे दि. २/६/२०२० चे फेरविचाराचे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ५२ दि. १६/४/२०२० चा फेरविचार करण्यात यावा.

सध्या संपुर्ण जगभरामध्ये थैमान घातलेल्या महामारी कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशामध्ये लॉकडाउनच्या धर्तीवर अनेक विविध प्रकारचे निर्बंध लादण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने अनेक नोकरदार, व्यावसायिक व समाजातील इ. घटक हा संपुर्ण देश लॉकडाउन असल्यामुळे विनाकाम घरीच आहे. यामुळे सदर घटकांना मोठया प्रमाणावर आर्थिक संकटास सामोरे जावे लागत आहे. याबाबत संपुर्ण देशात केंद्र शासन व राज्य शासनाने अनेक निर्बंध शिथिल केलेले आहेत.

याचअनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता करामध्ये खालील नमूद केलेल्या मुदद्यांप्रमाणे सध्यःस्थितीमध्ये अंमलबजावणी करण्यास मान्यता द्यावी.

१) चालू आर्थिक वर्षामध्ये माहे मे पर्यंत देण्यात येणारी ५ ते १० टक्के सवलत ही मुदत दि. ३१/०५/२०२० अखेर पर्यंत आहे. सदर मुदत दि.३१/५/२०२० ऐवजी दि.३०/६/२०२० अशी १ महिने वाढविण्यात यावी.
२) त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीचा कर न भरल्यास दि.१ जुलै पासून आकारण्यात येणारी शास्ती या वर्षापूर्तीच दि. १ ऑगस्ट २०२० पासून आकारण्यात यावी.

तसेच मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– १८४ त्वर्य**

प्रभाग क्र. १० ड बावधन कोथरुड डेपो अंतर्गत बावधन खुर्द स.नं. १९ येथील आरक्षित जागेवर प्ले–ग्राऊंड (PG12) वर ॲडव्हेंचर गेम पार्क व तद्नुषंगिक कामे करणे व बालभवन बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ब्रम्हा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७०,२१,४००=८९ पेक्षा १.२९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,३०,८२४=८१ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ८,४२,५६८=११ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.३,२१९=७३ मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू.६२,४२५/- पर्यंत अधिक थर्ड पार्टी कन्स्टलटन्सी चार्जेस र.रु. ७०,२१४/- अधिक टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०८ दि.२/६/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– १८५ त्वर्य**

आरोग्य खात्याकडील कमला नेहरू रूग्णालय व डॉ.नायडू रूग्णालय यांना अनुक्रमे अंदाजे लागणारे ४३८०० लिटर्स व १४६०० लिटर्स दूध सन २०२०–२०२१ या मुदतीसाठी शासकीय दूध योजना, पुणे यांचेकडून शासनाकडे उपलब्ध असलेल्या साठ्यानुसार प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर गाईचे दूध रू.३७=२५ या दराने होणारी र.रू.२१,७५,४००/– (अक्षरी–रू.एकवीस लाख पंच्याहत्तर हजार चारशे फक्त) पर्यत अगर रूग्णालयातील रूग्णांच्या संख्येत प्रासंगिक वाढ होत असते. शासन वेळोवेळी दर बदलत असते त्याप्रमाणे जादा दूध लागल्यास शासकीय दूध योजनेकडे उपलब्ध असलेल्या साठयानुसार वेळोवेळी कमी/जास्त प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर त्याप्रमाणे होणाऱ्या रकमेपर्यत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) नुसार दूध पुरविण्यासाठी शासकीय दूध योजना, पुणे यांचेकडून करारनामा न करता दूध खरेदी करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/आरोग्य/९६ दि. २९/५/२०२० चे पत्र.

(टिप – ही खरेदी राज्य शासनाच्या अधिकृत अशा शासकीय दूध योजनेकडून होत असल्याने व यापेक्षा कमी दर येण्याची शक्यता नसल्याने ही खरेदी शासकिय दूध योजना, पुणे ( गव्हर्नमेंट मिल्क सप्लाय स्किम ) यांचेकडून टेंडर न काढता खरेदी करणेत येत आहे.)

विषय क्रमांक :– १८६ त्वर्य

पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या तकत्याप्रमाणे एकूण ९८९१८ क्रमिक पुस्तके एकमेव शासकीय उत्पादित संस्था महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधक मंडळ, पुणे यांचेकडून टेंडर न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) अन्वये खरेदी करण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/शिवि(माध्य)/९७ दि.१/६/२०२० चे पत्र.

१)दि. ५ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबतचे आदेश प्राप्त झालेले आहेत तथापि सहसचिव महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे दि.१४/१२/२०१७ चे पत्रानुसार सन २०१८–१९ पासून मोफत पाठयपुस्तके थेट लाभार्थी विद्यार्थ्यांना शाळा स्तरावर देण्याची सद्यस्थितीतील योजनेप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी असे क्रमिक पुस्तके खरेदी करणेबाबत सूचित केले आहे.

सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना शासकीय उत्पादित संस्था महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधक मंडळ, पुणे यांचेकडून टेंडर न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) अन्वये खरेदी करणेत आली. त्याचप्रमाणे सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील शिक्षण घेणाऱ्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, उर्दु व इंग्रजी माध्यमाची व पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेमधील माध्यमिक शाळांमधील इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमाची क्रमिक पुस्तके देणेस

२) सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील शिक्षण घेणाऱ्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, उर्दु व इंग्रजी माध्यमाची व पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेमधील माध्यमिक शाळांमधील इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमाची क्रमिक पुस्तके खरेदी करणेस

३) इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ९८९१८ क्रमिक पुस्तके एकमेव शासकीय उत्पादित संस्था असलेल्या मा.भांडार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधक मंडळ, बालभारती, पुणे यांचेकडून टेंडर न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) अन्वये खरेदी करणेस

४)त्यासाठी येणाऱ्या र.रुपये ५०,७७,६४८/– (अक्षरी पन्नास लाख सत्याहत्तर हजार सहाशे अठ्ठेचाळीस फक्त) खर्चाची रक्कम मा.संचालक, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे (बँक ऑफ महाराष्ट्र खाते नंबर २०००९००००३, आयएफएससी कोड MAHB०००१२६१) यांचे नावे आरटीजीएसने जमा करणेस

५) विद्यार्थी संख्येत काही प्रमाणात वाढ झाल्यास मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे अधिकारात पुन:श्च क्रमिक पुस्तके खरेदी करणेस.

विषय क्रमांक :– १८७ त्वर्य

कोविड –१९ (कोरोना) विषाणूचा प्रादुर्भाव पाहता सद्यस्थितीतील तसेच भविष्यात तयार करण्यात येणाऱ्या विलगीकरण कक्षातील अंतर्गत वार्डमधील रूग्णांचे कपडे धुलाईचे काम पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालयाकडील कपडे धुलाई सन २०१९–२० चे मान्य ठेकेदार मे.क्वालिटी इंडस्ट्रीयल लॉण्ड्री यांचेकडून प्रति कपडा नग र.रू.३२/– नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७,(३)(क) अन्वये करण्यात येत असून या कामी आवश्यक तो करारनामा करण्यात आलेला आहे . सदरची बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९८ दि.२/६/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– १८८ त्वर्य

क्रस्ना डायग्नोस्टीक सेंटर प्रा.लि. यांचेकडून कोवीड – १९ साठी मोफत वातानुकूलित बस कुशल तंत्रज्ञासह दि.३१ जुलै २०२० पर्यंत रुग्णांची तपासणी करणेसाठी खालील बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९ दि.२/६/२०२० चे पत्र.

१) क्रस्ना डायग्नोस्टीक सेंटर प्रा.लि. यांचे प्रस्तावातील Package-1 मधील तपासणी प्रति रुग्ण रक्कम रु. ४००/– प्रमाणे करणेस
२) सदर कामी CSR अंतर्गत निधी उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३) (क) अन्वये खास बाब म्हणून मान्यता देणेस

३) भवानी पेठ परिसरामध्ये Pilot Project म्हणून ५००० तपासणी केल्यानंतर त्याचे फलनिष्पत्ती नंतर प्रकरणी पुढील निर्णय घेणेस

४) सदर कामी शासनाकडून निधी उपलब्ध करुन घेणेस

**विषय क्रमांक :– १८९ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध दवाखाने,रूग्णालयांसाठी एन ९५ मास्क्,पीपीई किट, व्हिटिएम किट कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १.आर.एस.एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ५,४०,०००/– २.लक्ष्मी मेडिकल्स यांचेकडून रक्कम रूपये २८,६५,०००/- ३.श्री एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ५,९४,०००/– ( जीएसटी करासह )असे एकुण रक्कम रूपये ३९,९९,०००/– ( अक्षरी रक्कम रूपये एकोणचाळीस लाख नव्यानव हजार फक्त ) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०० दि.२/६/२०२० चे पत्र.

लेखाशिर्ष :- नियोजन विभाग–मागणी क्र.ओ–१० ४५१५
इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना
(१)बहुउददेशीय कार्यक्रम (०० ) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम
(४५१५ ००१२) ( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.
मान्य तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/– पैकी ३९,९९,०००/–

**विषय क्रमांक :– १९० त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध दवाखाने,रूग्णालयांसाठी हॅन्ड सॅनिटायझर,एन ९५ मास्क्, पीपीई किट,व्हिटिम किट कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १.आर.एस.एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ५,४०,०००/– २.सुपर प्लॅस्टिक्स कॉर्पोरेशन यांचेकडून रक्कम रूपये २३,२५,०००/- ३.अरिहंत केमिस्ट यांचेकडून रक्कम रूपये ३,५७,५००/– ४.श्री एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ३,३०,०००/– ( जीएसटी करासह ( असे एकुण रक्कम रूपये ३५,५२,५००/– ( अक्षरी रक्कम रूपये पस्तीस लाख बावन्न् हजार पाचशे फक्त ) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क ) नुसार खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०१ दि.२/६/२०२० चे पत्र.

खर्चाचे अर्थशिर्षक :-
लेखाशिर्ष नियोजन विभाग–मागणी क्र.ओ–१० ४५१५ ,
इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना,
(१)बहुउददेशीय कार्यक्रम (०० ) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम(४५१५ ००१२)
( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.
मान्य तरतूद रक्कम रूपये ५०,००,०००/– पैकी ३५,५२,५००/–

**विषय क्रमांक :– १९१ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने,रूग्णालये व प्रसुतिगृहांसाठो कोव्हिड १९ साठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरीता पीपीई किटस, एन ९५ मास्क,इन्फ्रारेड थर्मामिटर, व्हिटिम किट कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १.आर.एस.एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ९,००,०००/- २.

आकांक्षा मेडिकल सिस्टिम्स प्रा.लि.__यांचेकडून रक्कम रूपये ४६,५०,०००/- ३. कॉम्युकेअर सोल्युशन्स यांचेकडून रक्कम रूपये २१,२४,०००/- ४.श्री एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये १९,८०,०००/- (जीएसटी करासह) असे एकुण रककम ९६,५४,०००/- पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३( (क) नुसार खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यता आला आहे.
सदर बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०२ दि.२/६/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17-31-F/RF-167
महापौर निधी.
मान्य तरतूद रक्क्म रूपये ४,००,००,०००/- पैकी ९६,५४,०००/-

विषय क्रमांक :– १९२ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालयासाठी इन्फ्रारेड थर्मामिटर कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे क्लॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि. यांचेकडून जीएसटी करासह रक्कम रूपये ६,९३,८४०/– पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क ) अन्वये खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.
सदर बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०३ दि.२/६/२०२० चे पत्र.

खर्चाचे अर्थशिर्षक :-
लेखाशिर्ष नियोजन विभाग–मागणी क्र.ओ–१० ४५१५,
इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना,
(१)बहुउददेशीय कार्यक्रम (०० ) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम
(४५१५ ००१२) ( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.

विषय क्रमांक :– १९३ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या विविध दवाखाने,रूग्णालयांसाठी पीपीई किटस, Sterile Surgical Gloves,एन-९५ मास्क, फेसमास्क कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १.कल्याणी गारमेंटस यांचेकडून रक्कम रूपये ३,७२,०००/– २. ओसक्युअर हेल्थकेअर यांचेकडून रक्कम रूपये ३,६०,०००/– ३.क्लॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि.यांचेकडून रक्कम रूपये ४,१४,०००/– ४. नमो फार्मा यांचेकडून रक्कम रूपये ८,५०,०००/– ( जीएसटी करासह ( असे एकुण रक्कम रूपये १९,९६,०००/– पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३( (क) नुसार खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.
सदर बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०४ दि.२/६/२०२० चे पत्र.

खर्चाचे अर्थशिर्षक :-
लेखाशिर्ष नियोजन विभाग–मागणी क्र.ओ–१०
इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना,
(१)बहुउददेशीय कार्यक्रम (००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम
(४५१५ ००१२) ( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.

**विषय क्रमांक :– १९४ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ येरवडा क्षेत्रिय कार्यालयासाठी,प्रभाग क्रमांक १९ भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयासाठी,प्रभाग क्रमांक २० ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालयासाठी पीपीई किटस,Viral Transport Medium, इन्फ्रारेड थर्मामिटर, कोटेशनव्दारे प्राप्त झालेल्या सर्वात कमी दर देणा-या पुरवठाधारकाकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे १. एसबीअे एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ११,९९,७००/– २.बिग बिअर फुडस प्रा.लि. यांचेकडून रक्कम रूपये १३,८७,५००/– ३.न्यु अमर एजन्सीज यांचेकडून रक्कम रूपये ४,१०,६४०/– (जीएसटी करासह) असे एकुण रक्कम रूपये २९,९७,८४०/– पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये खरेदी करण्यात आलेली असून आवश्यक तो करारनामा करण्यात आला आहे.

सदर बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०५ दि.२/६/२०२० चे पत्र.

खर्चाचे अर्थशिर्षक :-

लेखाशिर्ष नियोजन विभाग–मागणी क्र.ओ–१०

४५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च

१०२ – सामुहिक विकास पंचवार्षिक योजनाअंतर्गत राज्य योजनाअंतर्गत योजना

(१)बहुउददेशीय कार्यक्रम (००) (०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम

(४५१५ ००१२) ( योजनाअंतर्गत) (दत्तमत ) ५३ मोठी बांधकामे.

**विषय क्रमांक :– १९५ त्वर्य**

सध्या जगभरात कोरोना विषाणूचा उद्रेक झालेला असुन पुणे शहरात कोवीड–१९ बाबत प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

पुणे शहरात कोरोनाग्रस्त रुग्णांचे संख्येत झपाटयाने वाढ होत असुन पुणे शहरातील संशयित व बाधित रुग्णांना उपचारासाठी पुणे मनपा कडील उपलब्ध कोवीड केअर सेंटर या ठिकाणी उपचार करण्यात येतात. तसेच खाजगी हॉस्पिटसोबत कोवीड–१९ चे रुग्णांचे उपचारांसाठी समन्वयाने करार करुन हॉस्पिटल कोवीड–१९ साठी उपलब्ध करण्यात आलेले आहेत. याअनुषंगाने कोवीड–१९ चे प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत मोबाईल डिस्पेनसरी सेवेकरिता पुणे महानगरपालिका व भारतीय जैन संघटना (बीजेएस) यांचेमध्ये दि.११/०५/२०२० रोजी करार करण्यात आलेला आहे.

सदर करारानुसार भारतीय जैन संघटना (बी.जे.एस.) यांचे रुग्णवाहिकेमार्फत पुणे शहरातील कंटेनमेंट क्षेत्रातील नागरिकांची आरोग्य तपासणी व औषधोपचार तसेच संशयित रुग्णांचे स्वॅब घेऊन त्याचे सॅम्पल शासनमान्य लॅबकडे देण्यात येणार असुन त्याकरिता पुणे महानगरपालिकेमार्फत भारतीय जैन संघटनेस कोणत्याही प्रकारचे शुल्क अदा करण्यात येणार नाही.

सदर सॅम्पलची तपासणी ज्या शासनमान्य लॅबमार्फत करण्यात येणार आहे त्याचे सर्व रेकॉर्ड किपींग व रिपोर्टींग करणेची जबाबदारी संबंधित लॅबवर असणार आहे.

सदर रुग्णवाहिकेकरिता आवश्यक मनुष्यबळ भारतीय जैन संघटनेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार असुन आवश्यक औषधे व पी.पी.ई.किट आणि एन–९५ मास्क चा पुरवठा पुणे महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

तरी वर नमूद केल्याप्रमाणे अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०७ दि.२/६/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– १९६ त्वर्य**

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड १९ रुग्णांची वाढणारी संख्या व वाढत्या मृत्युचे प्रमाण कमी करणेसाठी करावयाच्या उपाययोजने अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ नुसार सर्वेक्षण (क) (३) करणाऱ्या सेविकांना मानधन अदाकरणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०७ दि.२/६/२०२० चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**